औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय**

कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक - ई, सी-२०, वान्द्रे-कुर्ला संकुल, वान्द्रे ( पुर्व ), मुंबई- ४०० ०५१.

फोन नं. २६५७२५०४/०९/२२/५८, Email- dirdish.mum-mh@gov.in Website-www.mahadish.in

---

क्र.संऔसुवआ/अपघात/सुलेप परीक्षा/ १८०३ /७,

दिनांक :2 2 APR 2025

# जाहीर सूचना

विषय : महाराष्ट्र कारखाने ( सुरक्षा लेखा परीक्षण ) ( सुधारणा ) नियम ,२०२४ अन्वये नवीन सुरक्षा लेखा परिक्षकांना /संस्थाना मान्यता देण्याच्या अनुषंगाने परीक्षेची तारीख घोषित करण्याबाबत.

१. परीक्षेची तारीख व वेळ:- सोमवार दिनांक २८/०४/२०२५ दुपारी ११.०० ते १२.००

२. मुलाखतीची वेळ- सोमवार दिनांक २८/०४/२०२५ दुपारी ३.०० वाजेनंतर

३. परीक्षेमध्ये एकूण ४० प्रश्न असतील. प्रत्येक बरोबर प्रश्नास ०२ गुण असतील आणि प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी ०.५ गुण कापण्यात येईल. मुलाखतीस एकूण २० गुण असतील.

४. लेखी व तोंडी परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येकी किमान ५० % गुण आवश्यक असतील.दोन्ही परीक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे.निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणल्यास अर्जदारास निवड प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

५. अर्जदाराची माहिती चुकीची अथवा दिशाभुल ठरविणारी आढळल्यास अर्जदारास निवड प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर बाद ठरविण्यात येईल. अर्जदाराने त्यांच्या नियोक्त्यास अनुभव प्रमाणपत्राबाबत पडताळणी ईमेलला त्वरीत प्रतिसाद देणेविषयी विनंती करावी, जेणेकरुन पडताळणी प्रक्रिया सुलभ व जलद होईल.

६. सुरक्षा लेखापरिक्षक म्हणून मान्यता मिळण्याकरीता या संचालनालयाकडे अर्ज केलेल्या व्यक्ती हा रासायनिक, यांत्रिकी, विद्युत, किंवा उत्पादन अभियांत्रिकी शाखेतील पदवी धारण केलेला अथवा अखिल

भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या दिनांक २८ एप्रिल, २०१७ च्या अधिसूचनेप्रमाणे समकक्ष शाखेतील पदवी धारण केलेला असावा.

७. कारखाने अधिनियम,१९४८ अतंर्गत नोंदणीकृत कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया, परिरक्षण, संकल्पचित्र, प्रकल्प किंवा सुरक्षितता विभाग यामधील पर्यवेक्षक किंवा त्यावरील पदाचा १० वर्षाचा अनुभव हा संबंधित पदवी धारण केलेल्या दिनांकापासून पुढील कालावधीचा ग्राहय धरण्यात येईल.

८. शासनाने सुरक्षा लेखापरिक्षक म्हणून मान्यता दिलेल्या रासायनिक, यांत्रिकी किंवा विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पदवी धारण केलेल्या सुरक्षा लेखापरिक्षकांनी संस्था या प्रकारातून अर्ज केला असेल तर त्या सुरक्षा लेखापरिक्षकास लेखी परिक्षेतून सुट देण्यात येईल. मात्र इतर सदस्य ज्यांना सुरक्षा लेखापरिक्षक म्हणून मान्यता देण्यात आली नाही त्यांना मात्र लेखी परीक्षा देणे बंधनकारक असेल.

९. संस्थेमार्फत अर्ज केलेल्या उमेदवारास जर स्वतंत्ररीत्या सुरक्षा लेखा परीक्षक प्रमाणपत्र हवे असल्यास त्यासाठी वैयक्तीक अर्ज ( नमुना क्र. अ ) करणे अनिवार्य आहे. अशा अर्जदारांची दोन्ही अर्जासाठी सामाईक लेखी परीक्षा असेल.

१०. अर्जदारांच्या कामाच्या अनुभव प्रमाणपत्रांची खातरजमा त्यांच्या नियोक्त्याकडून करण्यात येईल

( रा. दि. दहिफळे )
अपर संचालक
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,मुंबई
तथा समिती अध्यक्ष.